


महाराष्ट्राचे निडर दैनिक

# शौर्य मराठी



RNI-MAHMAR/2023/89125

epaper.shauryamarathi.com | जळगाव, धुळे, नंदुरबार | मंगळवार, दि. ३ मार्च २०२६ | वर्ष २ रे | अंक ११२ किंमत : ५ रु. | पाने ४





आज धुलिवंदन

## सुविचार

आपल्या आत्म्याच्या गहिराईत स्वत:चा शोध घ्या; तिथेच आपल्याला खरी शांती सापडेल.

**सूर्योदय - सूर्यास्त**

स.-६:४७ संध्या-६:३३

**सोने – चांदी**

सोने(१० ग्रॅम) - चांदी (प्रति किलो)

१,७२,१३०/- ३,१५,०००/-

**केळी भाव**

नवती : १३५५ ते १३६०

पिल बाग : ११०१ ते ११०२

कांदे बाग : ----

**सुटीची सूचना**

धुलिवंदन दिनानिमित्त **दैनिक शौर्य मराठी** कार्यालयाला आज दि.३ मार्च रोजी सुटी राहिल. त्यामुळे दि.४ मार्च रोजीचा अंक प्रकाशित होणार नाही. याची सर्व वाचक, हितचिंतक व जाहिरातदारांनी नोंद घ्यावी.

– मुख्य संपादक

## थोडक्यात

### माजी खासदार डॉ. जे. एम. वाघमारे यांचे निधन

**मुंबई ।** माजी खासदार, माजी कुलगुरू आणि थोर विचारवंत डॉ. जनार्दन माधवराव वाघमारे यांचे आज सकाळी साडेआठ वाजता निधन झाले. त्यांच्या निधनाने शिक्षण, समाजकारण आणि सार्वजनिक जीवनातील एक ज्येष्ठ, अभ्यासू व वैचारिक नेतृत्व काळाच्या पडद्याआड गेले आहे.

# भारत अलर्ट मोडवर!

## इराण–अमेरिका युद्धाच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारकडून राज्यांना सतर्कतेचा इशारा

वृत्तसंस्था । नवी दिल्ली

**इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला खामेनी यांचा अमेरिका–इस्रायलच्या संयुक्त हल्ल्यात मृत्यू झाला. याचे पडसाद आता भारतात उमटायला सुरुवात झाली आहे. त्यामुळे भारतातील संरक्षण यंत्रणांनाही सतर्क राहण्याचे निर्देश देण्यात आल्याचे वृत्त वृत्तसंस्थांनी दिले आहे. तसंच, केंद्रीय गृहमंत्रालयाने राज्यांनाही सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे. टाइम्स नाऊने यासंदर्भातील वृत्त दिलंय.**

**राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांना आवाहन**

गेल्या काही दिवसांपासून इस्रायल आणि अमेरिकेने इराणवर हल्ले वाढवले असून या तिन्ही देशांतील संघर्ष वाढला आहे. त्याचा परिणाम आंतरराष्ट्रीय पातळीवर सर्वच देशांमध्ये होत असून



भारतातही याचे पडसाद उमटायला सुरुवात झाली आहे. त्यामुळे २८ फ ेब्रुवारी रोजी सर्व राज्यांना **(पान २ वर)**

### ➤ पंतप्रधानांची सुरक्षा यंत्रणांबरोबर बैठक

पश्चिम आशियातील वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी रात्री देशाच्या सुरक्षा आणि धोरणात्मक बाबींवरील सर्वोच्च निर्णय घेणारी संस्था असलेल्या सुरक्षा मंत्रिमंडळ समितीची बैठक घेतली. सीसीएसने पश्चिम आशियातील ताज्या संघर्षामुळे उद्भवलेल्या परिस्थिती आणि तेथे अडकलेल्या भारतीयांबाबत चर्चा केल्याचे वृत्त आहे, असे वृत्तसंस्था पीटीआयने दिले आहे.

# गर्भवतींची आता धोक्यातून सुटका!



वृत्तसंस्था । पुणे

**देशात एकूण गर्भवतींपैकी सुमारे ५२ टक्के महिला रक्तक्षयाने ग्रस्त आढळून येतात. रक्तक्षयामुळे मातेच्या आरोग्यावर व प्रसूतीवर गंभीर परिणाम दिसून येतात. अनेक वेळा माता अथवा बालमृत्यूचे हे महत्त्वाचे कारण ठरते. या पार्श्वभूमीवर सार्वजनिक आरोग्य विभागाने गर्भवतींची हिमोग्लोबीन पातळी तपासून, त्यांच्या रक्तवाढीसाठी**

### राज्यात आरोग्य विभागाचे मोठे पाऊल

**लसीकरण करण्याची मोहीम हाती घेतली आहे.**

मातृत्व हा महिलांच्या जीवनातील महत्त्वाचा टप्पा असल्याने त्यांचे आरोग्य व पोषण योग्य पद्धतीने होणे आवश्यक आहे. देशात गर्भवतींमध्ये रक्तक्षयाचे प्रमाण अधिक आहे. रक्तक्षयामुळे गर्भवतींच्या आरोग्यावर **(पान २ वर)**

# जळगाव कृषी उत्पन्न बाजार समितीत दादरला ४ हजार ६०० उच्चांकी भाव!

प्रतिनिधी । जळगाव

**शहरातील कृषी उत्पन्न बाजार समितीत रब्बी हंगामातील दादर ज्वारीची आवक दिवसेंदिवस वाढत आहे. सोमवारी देखील विक्रमी आवक झाली. ग्राहकांची मागणी चांगली असल्याने दादरला उच्चांकी ४ हजार ६०० दर मिळाला आहे.**

रब्बी हंगामातील विविध पिकांची काढणी सुरु होताच जिल्ह्यातील शेतकरी आणि व्यापाऱ्यांचे लक्ष लागून राहिलेल्या जळगाव कृषी उत्पन्न बाजार समितीत दादर ज्वारीची आवक वाढल्याचे पाहायला मिळत आहेत. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, फेब्रुवारीअखेर शनिवारी बाजार समितीत दादर ज्वारीची सुमारे ३६० क्विंटलपर्यंत आवक झाली होती. आणि त्या दिवशी ज्वारीला किमान २६०० रुपये, कमाल



४२०० रुपये आणि सरासरी ३९०० रुपये प्रतिक्विंटल असा दर मिळाला होता.

रविवारी साप्ताहिक सुट्टीमुळे बाजार समितीतील व्यवहार बंद होते. त्यामुळे सोमवारी बाजार उघडल्यानंतर तब्बल ८२० क्विंटलपर्यंत दादर ज्वारी बाजारात दाखल झाली. आवक दुपटीपेक्षा जास्त असतानाही दरात मात्र तेजीचे चित्र दिसून आले. सोमवारी कृषी उत्पन्न बाजार समितीत दादर ज्वारीला किमान २९०० **(पान २ वर)**

# महायुती राज्यसभेच्या सातही जागा लढवणार

## महायुती ७ व्या जागेवर उमेदवार देऊन महाविकास आघाडीला धक्का देण्याच्या तयारीत

वृत्तसंस्था । मुंबई

**महाराष्ट्रातील राज्यसभेच्या ७ जागांसाठी १६ मार्च रोजी निवडणूक होणार असून राजकीय हालचालींना वेग आला आहे. विधानसभेतील संख्याबळानुसार महायुतीला ६ तर महाविकास आघाडीला १ जागा मिळण्याची शक्यता आहे. मात्र, आता सातव्या जागेवरही महायुती उमेदवार देण्याची शक्यता वर्तवली जात असल्याने राजकीय समीकरणे ढवळून निघाली आहेत.**

महायुतीत ४ जागा भाजप १ जागा शिवसेना (शिंदे गट) आणि १ जागा राष्ट्रवादी काँग्रेस यांना मिळणार असल्याचे गणित आहे. राष्ट्रवादीकडून पार्थ पवार यांचे नाव जवळपास निश्चित मानले जात आहे.

भाजपच्या कोअर कमिटी बैठकीत अनेक दिग्गज नेत्यांची नावे चर्चेत आली. त्यामध्ये विनोद तावडे, रामदास आठवले, रावसाहेब दानवे, प्रीतम मुंडे, विजया रहाटकर, धैर्यशील पाटील आणि भागवत



### ➤ सातव्या जागेवरही डाव?

महाविकास आघाडीत एकमेव जागेवरून तिन्ही पक्षांत रस्सीखेच सुरू असल्याची माहिती आहे. उमेदवार निश्चितीवरून मतभेद असल्याने महायुती सातव्या जागेवरही उमेदवार देऊन विरोधकांना धक्का देण्याची रणनीती आखत असल्याची चर्चा रंगली आहे.

कराड यांच्या नावांची चर्चा आहे. महायुती सातव्या जागेसाठी उमेदवार दिल्यास मविआसमोर मोठे आव्हान उभे राहू शकते. त्यामुळे **(पान २ वर)**

# इराणच्या गुप्तचर मंत्रालयातील अधिकाऱ्यांवर इस्त्रायलचा हल्ला

## अनेक वरिष्ठ अधिकाऱ्यांना मारल्याचा आयडीएफचा दावा

वृत्तसंस्था । जेरुसलेम

**इस्रायल आणि अमेरिकेने संयुक्तपणे इराणवर हल्ले सुरू ठेवले असून इराणकडूनही प्रत्युत्तर येत आहे. दरम्यान, इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला खामेनी हल्ल्यात मारले गेल्यानंतर आता इस्रायलने पुन्हा एकदा इराणच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना लक्ष्य केलं आहे. इस्रायलने थेट गुप्तचर मंत्रालयाच्या अधिकाऱ्यांवरच हल्ले केले. या हल्ल्यात अनेक वरिष्ठ अधिकारी मारले गेल्याचा दावा इस्रायलने केला आहे. इस्रायलच्या लष्करी दलाने यासंदर्भात एक्स पोस्ट केली आहे.**



इस्रायल लष्करी दलाने एक्सवर केलेल्या पोस्टनुसार, या हल्ल्यात सय्यद याह्या हमिदी मारले गेले असून ते इस्रायल व्यवहार विभागाचे उपगुप्तचर मंत्री होते. यांनी इराण आणि परदेशात ज्यू, पाश्चात्य घटक आणि शासन विरोधकांना **(पान २ वर)**

# दुबईत अडकले पुण्याचे ८४ विद्यार्थी

वृत्तसंस्था । पुणे

इस्राईल आणि इराण युद्धादरम्यान एक मोठी बातमी पुढे आली आहे. महाराष्ट्रातील पुणे येथील एका इन्स्टिट्यूटमधील एमबीएचे ८४ विद्यार्थी दुबईत अडकले आहे. असे म्हटले जात आहे की दुबईची एअरस्पेस बंद पडल्याने या विद्यार्थ्यांच्या सुटकेचा मार्ग बंद झाला आहे. सध्या विद्यार्थ्यांना सुरक्षित ठिकाणी हलवण्यात आले आहे. महाविद्यालयाच्या व्यवस्थापनाने विद्यार्थ्यांना मायदेशात परत आणण्यासाठी परराष्ट्र मंत्रालयाशी बोलणी चालू केली आहेत.

# सौदी अरेबियातील अरामको कंपनीवर इराणचा ड्रोन हल्ला

## जगातल्या सर्वात मोठ्या रिफायनरीला आग

वृत्तसंस्था । रास तनुरा

**अमेरिका, इस्रायल आणि इराण यांच्या युद्धाचे पडसाद थेट सौदी अरेबियातील अरामको रिफायनरीपर्यंत पोहचले आहेत. रॉयटर्सच्या वृत्तानुसार सौदी अरेबियातील सरकारी तेल कंपनी असलेल्या अरामकोवर ड्रोन हल्ला केला. अरामको ही जगातली सर्वात मोठी रिफायनरी आहे. या कंपनीवर ड्रोन हल्ला करण्यात आल्याने कंपनीला आग लागली आहे. तसंच कंपनी बंदही करण्यात आली असून आग नियंत्रणात आणण्यासाठीचे प्रयत्न सुरु आहेत. घटनास्थळावरुन आगीचे लोळ आणि धुराचे लोट दिसून येत आहेत.**

रॉयटर्सच्या वृत्तानुसार एका अधिकाऱ्याने



सांगितलं की सावधगिरीचा उपाय म्हणून अरामकोची रास तनुरा रिफायनरी तूर्तास बंद आहे. सध्या आग नियंत्रणात आणली जात आहे. सोशल **(पान २ वर)**

# राज्यात उन्हाचा तडाखा वाढणार

## • हवामान विभागाचा गंभीर इशारा; नागरिकांनी उन्हात न जाण्याचा दिला सल्ला

वृत्तसंस्था । मुंबई

**महाराष्ट्र राज्यात मार्चची सुरुवात होताच हवामानात झपाट्याने बदल होत असून उष्णतेचा चटका अधिक तीव्र होण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे. काही दिवसांपूर्वी अवकाळी पावसामुळे दिलासा मिळाला असला, तरी आता पुन्हा कोरडे आणि उष्ण वातावरण तयार होत आहे.**

हवामान विभागाच्या अंदाजानुसार पुढील काही दिवस राज्यातील तापमानात वाढ होणार असून उकाड्याची तीव्रता अधिक जाणवेल. विशेषतः कोकण पट्ट्यात दमट आणि उष्ण हवामान राहण्याचा इशारा देण्यात आला आहे. सकाळी आणि संध्याकाळीही उकाडा जाणवण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. गेल्या आठवड्यात राज्यातील अनेक भागांत अवकाळी पावसाने हजेरी लावली होती. या पावसामुळे शेती पिकांचे नुकसान झाले असून शेतकऱ्यांकडून नुकसानभरपाईची मागणी होत आहे. मात्र पावसाचा प्रभाव ओसरताच तापमान पुन्हा वाढू लागले आहे. १ जानेवारी २०२६ रोजी झालेल्या पावसानंतर थंडीचा प्रभाव कमी झाला. डिसेंबरमध्ये जाणवलेली थंडीही अल्पकाळ टिकली. उत्तरेकडील भागातही थंड हवामान घटल्याचे निरीक्षण नोंदवण्यात आले आहे.

### ➤ मार्चमध्ये उन्हाचा जोर वाढणार



**मार्च महिन्यात राज्यातील बहुतांश भागांत तापमानात आणखी वाढ होण्याची शक्यता आहे. आकाश निरभ्र आणि हवामान कोरडे राहणार असल्याने उन्हाचा त्रास वाढू शकतो. थंडी आणि पावसाचा प्रभाव जवळपास नाहीसा होऊन उन्हाळ्याची तीव्रता जाणवू लागेल, असा अंदाज आहे.**

**तापमानातील मोठी तफावत**

राज्यात तापमानात लक्षणीय चढ–उतार दिसून येत आहेत. निफाड येथे किमान तापमान ११.७ अंश सेल्सिअस इतके नोंदवले गेले, तर अमरावती येथे कमाल तापमान **(पान २ वर)**

# अमेरिकेची तीन लढाऊ विमाने पाडली

वृत्तसंस्था । कुवेत सिटी

**इराणसोबत सुरू असलेल्या संघर्षादरम्यान एक मोठी दुर्घटना घडली आहे. अमेरिकेची तीन मक्र-१५एफलढाऊ विमाने कुवेतच्या हवाई संरक्षण दलाने चुकून पाडली आहेत. ही घटना 'फ्रेंडली फायर' असल्याचे अमेरिकन लष्कराने सोमवारी स्पष्ट केले. इराणमध्ये सुरू असलेल्या लष्करी मोहिमेला पाठिंबा देण्यासाठी ही विमाने उड्डाण करत होती. त्यापूर्वी सोशल मीडियावर काही व्हिडिओ व्हायरल झाले होते,**



**ज्यामध्ये अमेरिकेची विमाने आगीच्या ज्वाळांत जमिनीवर कोसळताना दिसत होती. इंडियन एक्स्प्रेसने यासंदर्भातील वृत्त दिलं आहे.**

इराणसोबतचा अमेरिकेचा संघर्ष आता युद्धात रूपांतरित होत आहे. शनिवारी अमेरिका आणि इस्रायलने संयुक्तपणे केलेल्या हवाई हल्ल्यात इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला **(पान २ वर)**

## संपादकीय

### युद्धाचे चटके

जगातील सर्वात मोठी महासत्ता असलेली अमेरिका आणि नेहमीच लष्करी संघर्षाच्या तयारीत असलेला इस्त्रायल यांनी एकमेकांच्या साथीने इराणवर केलेल्या युद्ध हल्ल्यामुळे आधीच होरपळलेल्या जगाला युद्धाचे चटके अधिकच तीव्रतेने जाणवणार आहेत. गेल्या काही वर्षांच्या कालावधीमध्ये रशिया आणि युक्रेन यांच्यातील संघर्षाने जगाला हादरवून सोडले होते. त्यानंतर भारत आणि पाकिस्तान यांच्यातील छोटा लष्करी संघर्षही समोर आला होता. इस्त्रायल आणि पॅलेस्टाइन यांच्यातील लष्करी संघर्ष दीर्घकाळ सुरू आहे. सध्या अफगाणिस्तान आणि पाकिस्तान यांच्यामध्ये सुद्धा युद्धसदृश परिस्थिती आहे. हे सर्व कमी होते म्हणून की काय आता इस्त्रायलने इराणवर घातक हल्ले करून जगाला आणखी एका मोठ्या युद्धाच्या उंबरठ्यावर आणून सोडले आहे. अर्थात, अमेरिकेच्या पुढाकाराने आणि सहकार्यानेच इस्त्रायलने हे हल्ले केले असल्याने या हल्ल्यामागे अमेरिकेचा मेंदू आहे हे उघड आहे. खरे तर एकीकडे इराण आणि अमेरिका यांच्यामध्ये जिनेव्हा येथे शांतता चर्चा सुरू असतानाच अशा प्रकारचे हल्ले करण्यात आले. या चर्चेतून काय निष्पन्न होत आहे याची वाट पाहण्याची तसदीही अमेरिका आणि इस्त्रायल यांनी घेतली नाही. अर्थात, या दोन्ही देशांना कोणत्या ना कोणत्या कारणाने इराणवर हल्ला करण्याची संधी हवीच होती. गेल्या वर्षीसुद्धा जून महिन्यामध्ये जे बारा दिवसांचे युद्ध झाले तेव्हासुद्धा या दोन देशांनी अशाच प्रकारे संधी मिळताच इराणला टार्गेट केले होते. इराणने आपला आण्विक कार्यक्रम थांबवावा आणि इराणी जनतेने आपले नेते बदलावेत या मागण्या अमेरिकेने कायम समोर ठेवल्या आहेत. पण इराणने कधीही अमेरिकेच्या या मागणीला महत्त्व दिलेले नाही. गेल्या काही वर्षांमध्ये उलट इराणने आपला आण्विक कार्यक्रम तीव्रतेने राबवला आहे. या कार्यक्रमासाठी लागणाऱ्या युरेनियम या इंधनाचा साठा इराणकडून मोठ्या प्रमाणात करण्यात येत आहे. जरी आम्ही अण्वस्त्र निर्मिती करत नाही असे इराणने जाहीर केले असले, तरी इस्त्रायल आणि अमेरिकेचा त्यावर विश्वास नाही. प्रादेशिक शांततेसाठी इराणने आपला आण्विक कार्यक्रम थांबवावा अशी मागणी सातत्याने या दोन देशांकडून करण्यात येत होती.

# रावलापाणी येथील ऐतिहासिक स्थळी राबवली युवा क्रांतीतर्फे स्वच्छता मोहिम

## शहीद स्मृती जपण्याचा प्रेरणादायी उपक्रम

प्रतिनिधी । कोलवीमाळ

**तळोदा तालुक्यातील रावलापाणी हे ठिकाण आदिवासी स्वातंत्र्य संग्रामाच्या इतिहासात विशेष स्थान राखून आहे. ब्रिटिश सत्तेविरुद्ध आदिवासी समाजात जागृती निर्माण करणाऱ्या संत परंपरेत संत गुलाम महाराज यांचे बंधू संत रामदास महाराज यांनी स्वातंत्र्याची चळवळ उभारली होती.**

या चळवळीला दडपण्यासाठी ब्रिटिश अधिकाऱ्यांनी २ मार्च १९४३ रोजी रावलापाणी येथे आदिवासी सत्याग्रहींवर बेछूट गोळीबार केला. या घटनेत सुमारे २० आदिवासी शहीद झाले, तर शेकडो जखमी झाले. अनेकांवर गुन्हे दाखल करून दडपशाही करण्यात आली. त्यामुळे रावलापाणी ही भूमी आदिवासी शौर्य, बलिदान आणि अन्यायाविरुद्धच्या संघर्षाची साक्षीदार मानली जाते.

या ऐतिहासिक स्मृती जपण्याच्या हेतूने युवा क्रांती नंदुरबार संघटनेच्या वतीने येथे व्यापक स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. स्मृतीस्थळ परिसर, आजूबाजूचा मोकळा भाग तसेच नदीकाठ स्वच्छ करण्यात आला. विशेष म्हणजे नदीपात्रातील प्लास्टिक कचरा व साचलेला घनकचरा काढून जलस्रोत स्वच्छ ठेवण्याचा प्रयत्न करण्यात आला. युवकांनी श्रमदान करून परिसर नीटनेटका व स्वच्छ केला.



या मोहिमेत प्रदेशाध्यक्ष ॲड. रुपसिंग वसावे, प्रदेश सरचिटणीस ॲड. दीपक वसावे, जिल्हाध्यक्ष इंजि. संदीप वळवी, जिल्हा कार्याध्यक्ष नितेश वसावे, जिल्हा उपप्रमुख डॉ. पंकज तडवी, तळोदा तालुका कार्याध्यक्ष नितीन वळवी यांच्यासह सामाजिक कार्यकर्ते पांडुरंग नाईक, हातबारी पाडा येथील राजेश वळवी, विजयसिंग गुरुजी पाडवी आणि स्थानिक ग्रामस्थ मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

यावेळी उपस्थितांनी सांगितले की, शहीदांच्या बलिदानाची आठवण केवळ एका दिवसापुरती मर्यादित न ठेवता त्या स्मृतीस्थळाचे संवर्धन करणे ही खरी आदरांजली आहे. स्वच्छता, पर्यावरण संवर्धन आणि इतिहासाची जपणूक या तिन्ही गोष्टी एकत्रितपणे राबवल्या तरच पुढील पिढीला आपल्या संघर्षमय इतिहासाची प्रेरणा मिळेल.



रावलापाणी येथील हा उपक्रम समाजासाठी बोधप्रद ठरला असून प्रत्येक गावाने आपल्या ऐतिहासिक व धार्मिक स्थळांचे जतन करण्यासाठी पुढाकार घ्यावा, असा संदेश या मोहिमेतून देण्यात आला.

## पान १ वरुन

**महायुती राज्यसभेच्या……**

देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील रणनीतीमुळे उद्धव ठाकरे आणि शरद पवार यांच्यावर दबाव वाढण्याची शक्यता आहे. आता अंतिम यादी जाहीर झाल्यानंतरच राज्यसभेच्या लढतीचे चित्र स्पष्ट होणार आहे. मात्र, सातव्या जागेच्या चर्चेमुळे राज्याच्या राजकारणात उत्सुकता शिगेला पोहोचली आहे.

**सौदी अरेबियातील अरामको……**

मीडियावर जे व्हिडीओ व्हायरल होत आहेत. त्यात आगीचे लोळ आणि धुराचे लोट दिसत आहेत. २८ फेब्रुवारीला अमेरिका आणि इस्त्रायलने संयुक्त कारवाई करत इराणवर हल्ला केला ज्यानंतर आखाती भागात युद्ध सुरु झालं. यानंतर जगात कच्च्या तेलाच्या किंमतीही महाग झाल्या आहेत. लंडनमध्ये कच्च्या तेलाची किंमत जवळपास १० टक्क्यांनी वाढली. अशा घटना जगात घडत असताना रिफायनरीला आग लागणं ही घटना जगातल्या तेल बाजारपेठांसाठी चांगली नाही. अरामको कंपनी १९३३ ला सुरु झाली–अरामको कंपनी १९३३ ला सुरु झाली होती. या कंपनीचा पाया अमेरिकेच्या भागिदारीनंतर रचला गेला होता. १९८० च्या दशकापर्यंत कंपनीचं संपूर्ण अधिग्रहण सौदी सरकारने केलं. या ठिकाणी ७५ हजार लोक काम करतात. या कंपनीची मार्केट कॅप १.६-१.७ ट्रिलियन डॉलर्सच्या आसपास आहे. याला कुबेराचा खजिना असंच म्हटलं आहे. ही कंपनी सरासरी १० ते १२ मिलियन बॅरल कच्च्या तेलाचं उत्पादन करते.

**राज्यात उन्हाचा तडाखा……**

३६.८ अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचले. या आकडेवारीवरून हवामानातील अस्थिरता स्पष्ट होते. हवामान खात्याने नागरिकांना दुपारच्या कडक उन्हात बाहेर जाणे टाळावे, पुरेसे पाणी प्यावे आणि आरोग्याची विशेष काळजी घ्यावी, असा सल्ला दिला आहे. विशेषतः लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि शेतकरी यांनी अधिक सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

**जळगाव येथील बाजार समितीत……**

रुपये, कमाल ४६३० रुपये आणि सरासरी ४००० रुपये प्रतिक्विंटल असा दर मिळाला. विशेष म्हणजे, आवक मोठ्या प्रमाणात असतानाही दरात घसरण न होता उलट सरासरी दरात वाढ झाल्याचे चित्र दिसले. यामुळे शेतकऱ्यांमध्ये समाधान व्यक्त करण्यात येत आहे.व्यापाऱ्यांच्या मते, दर्जेदार मालाला चांगली मागणी असल्याने उच्चांकी दर मिळत आहेत.

**इराणच्या गुप्तचर……**

लक्ष्य करणाऱ्या दहशतवादी कारवायांचे नेतृत्व केले होते. तसंच, हेरगिरी विभागाचे प्रमुख जलाल पूर हुसेन हेही या हल्ल्यात ठार झाले असल्याची माहिती देण्यात आली आहे. आयडीएफच्या गुप्तचर विभागाकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे, 'ऑपरेशन रोअरिंग लायन'च्या सुरुवातीच्या हल्ल्यात त्यांना लक्ष्य करण्यात आले आणि त्यांचा खात्मा करण्यात आला. इतर अनेक वरिष्ठ अधिकाऱ्यांचाही यात खात्मा झाला आहे. तसंच, इस्रायली हवाई दलाने तेहरानमधील मंत्रालयाच्या मुख्यालयावरही हल्ला केला असल्याचं इस्रालयलच्या लष्करी दलाने सांगितलं आहे.

**गर्भवतींची आता……**

व प्रसूतीवर गंभीर परिणाम दिसून येतात. एकूण रक्तक्षय असणाऱ्या गर्भवतींपैकी ३ ते ५ टक्के मातांना तीव्र स्वरूपाचा रक्तक्षय आढळून येतो. अशा तीव्र रक्तक्षय आढळणाऱ्या सर्व गर्भवतींची हिमोग्लोबीन पातळी तपासण्यात येणार आहे. त्यांना गरजेनुसार वैद्यकीय देखरेखीखाली रक्तवाढीसाठी लसीद्वारे आयर्न सुक्रोज अथवा फेरिक कार्बोक्सीमाल्टोज देण्याची मोहीम सार्वजनिक आरोग्य विभागातर्फे राबविण्यात येत आहे. या मोहिमेत गर्भवतींची चौथ्या महिन्यानंतर तपासणी करून तीव्र रक्तक्षय असणाऱ्या मातांना शासकीय आरोग्य संस्थेत मोफत उपचार देण्यात येत आहेत. काही गरजू मातांना रक्तसंक्रमण करून उपचार दिला जातो. या उपचारपद्धतीमुळे रक्तपातळीत वाढ होऊन मुदतीआधीची प्रसूती, प्रसूतिपश्चात रक्तस्राव अशी गुंतागुंत कमी होऊन मातामृत्यूचे प्रमाण कमी करण्यास मदत होणार आहे. याशिवाय गर्भवती मातेला चौरस लोहयुक्त आहार, वैयक्तिक स्वच्छता, वेळेत सर्व तपासण्या व संदर्भ सेवा यासाठी समुपदेशनही करण्यात येत आहे, अशी माहिती सार्वजनिक आरोग्य विभागाच्या वतीने देण्यात आली. बालकांसाठी विशेष अभियान – राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम हा मुलांच्या आरोग्याचे संवर्धन व विकास साधण्यासाठी राबविला जातो. या माध्यमातून बालकांच्या आरोग्याची तपासणी व त्यांच्या आढळणाऱ्या आजारांना वेळीच पायबंद घालण्यात येतो. या कार्यक्रमांतर्गत विशेष अभियान ८ जानेवारी ते ३१ मार्च या कालावधीत राबविण्यात येत आहे. या अभियानामध्ये १७ फेब्रुवारीपर्यंत ३३४ बालकांच्या हृदय शस्त्रक्रिया आणि २ हजार २४० बालकांवर इतर शस्त्रक्रिया (हर्निया, क्लेफ्ट लिप इ.) करण्यात आलेल्या आहेत.

**अमेरिकेची तीन लढाऊ ……**

सोमवारी कुवेत सरकारने त्यांच्या देशात अमेरिकेची काही विमाने कोसळल्याची घोषणा केली होती. त्यानंतर लगेचच अमेरिकन सेंट्रल कमांडने निवेदन प्रसिद्ध केले. यात म्हटले आहे की, 'इराण मोहिमेवर असलेली तीन मक्र-१५एफ लढाऊ विमाने कुवेतच्या एअर डिफेन्स सिस्टीमने चुकून पाडली. हा प्रकार तांत्रिक गोंधळातून किंवा त्रुटीमुळे झाला असावा. अमेरिकेकडून स्पष्टीकरण – घटनेच्या कारणांचा तपास सुरू असल्याचे स्पष्ट करत, अमेरिकन सेंट्रल कमांडने अधिकृत निवेदन प्रसिद्ध केले आहे. त्यात म्हटलंय की, '१ मार्च रोजी रात्री ११:०३ वाजता , 'ऑपरेशन एपिक फ्युरी'ला पाठिंबा देण्यासाठी उड्डाण करणारी अमेरिकेची तीन मक्र-१५एफस्ट्राईक ईगल्स 'लढाऊ विमाने कुवेतच्या हद्दीत कोसळली. हा प्रकार प्रामुख्याने 'फ्रेंडली फायर' (मित्राकडून झालेला चुकीचा हल्ला) असल्याचे दिसून येत आहे'. 'इराणी विमाने, बॅलेस्टिक क्षेपणास्त्रे आणि ड्रोन हल्ल्यांविरुद्ध सुरू असलेल्या सक्रिय युद्धादरम्यान , कुवेतच्या हवाई संरक्षण दलाकडून चुकीने अमेरिकन हवाई दलाची ही लढाऊ विमाने पाडली गेली', असंही त्यात म्हटलं आहे. अली खामेनी यांच्यासह अनेक महत्त्वाचे राजकीय आणि लष्करी अधिकारी मारले गेले. या हल्ल्यानंतर इराणने आक्रमक पवित्रा घेत अमेरिकेच्या मित्रराष्ट्रांवर ड्रोन आणि क्षेपणास्त्रांचा मारा सुरू केला आहे.

**भारत अलर्ट मोडवर……**

पाठवलेल्या पत्रात मंत्रालयाने सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांना अतिरेकी आणि जागतिक दहशतवादी गटांच्या सोशल मिडिया पोस्ट्सवर लक्ष ठेवण्यास सांगितलं आहे, असं वृत्त पीटीआयने दिलंय. तसंच, देशात कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणार नाही, याचीही दक्षता ठेवण्याचा सल्ला राज्यांना देण्यात आलाय. तर, इस्रायल आणि अमेरिकेचे वाणिज्य दूतावास आणि इतर राजनैतिक कार्यालये असलेल्या राज्यांना कोणतीही अनुचित घटना टाळण्यासाठी सुरक्षा वाढवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. खामेनी यांच्या मृत्यूनंतर भारतात निदर्शने – अयातुल्ला अली खामेनी यांचा मृत्यू झाल्यानंतर त्याचे भारतातही पडसाद उमटले. काश्मीरपासून कर्नाटकपर्यंत विविध शहरांमध्ये मुख्यतः शियापंथीय मुस्लिमांनी रस्त्यावर उतरून खामेनी यांच्या मृत्यूबद्दल शोक आणि संताप व्यक्त केला. अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, जम्मू आणि काश्मीरच्या जम्मू, श्रीनगर, बारामुल्ला, बडगाम, बांदीपुरा, अनंतनाग आणि पुलवामा येथे मोठ्या प्रमाणात लोक एकत्र आले होते. यावेळी अमेरिकाविरोधी आणि इस्रायलविरोधी घोषणा देण्यात आल्या. काश्मीरच्या नेत्यांकडून शांततेचे आवाहन – जम्मू-काश्मीरचे मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांनी इराणमधील घडामोडींबद्दल चिंता व्यक्त केली आणि निदर्शकांना शांततेचे आवाहन केले. सध्या इराणमध्ये असलेले जम्मू-काश्मीरचे विद्यार्थी, रहिवासी यांच्या सुरक्षेची खबरदारी घेण्यासाठी आपले सरकार परराष्ट्र मंत्रालयाशी समन्वयाने काम करत आहे, असे अब्दुल्ला यांनी सांगितले. पीडीपीच्या नेत्या मेहबुबा मुफ्ती, काश्मीरचे मुख्य धर्मगुरू मिरवैज उमर फारुख यांनीही खामेनी यांच्या मृत्यूबद्दल शोक व्यक्त केला.

# राजवाडी होळीचा बांबू काठी गावात दाखल

## गुजरातच्या नामगी डोंगरातून भाविकांचा पायी प्रवास

प्रतिनिधी । अक्कलकुवा

**तालुक्यातील मोलगी सातपुड्यात प्रसिद्ध असलेल्या काठी गावाच्या मानाच्या राजवाडी होळीसाठी गुजरात राज्यातील नामगीकिसरी डोंगर परिसरातून रविवारी होळीचा बांबू काठीकडे रवाना झाला.**

व्रतधारी भाविकांनी अनेक दिवसांचे व्रत पाळून हा पवित्र बांबू पायी आणण्याची परंपरा यंदाही तितक्याच श्रद्धेने निभावत आहेत. होळीचा बांबू महाराष्ट्रात



प्रवेश केल्यानंतर प्रथम मोकस या गावी मुक्कामी असतो. त्यानंतर चापडी, पांढरामाती, मोकस, नाली, पिंपळखुटा, सुरगस, बारिसुरगस, हाअगट, बिजलीगव्हाण, सोराचापडा, थेवाबारा, निंबीपाडा, मालपाडा आदी गावांमधून मार्गक्रमण करीत रात्री ८ ते १० वाजेदरम्यान काठी गावात पोहोचणार आहे. वंशपरंपरेनुसार काठी संस्थानाचे वंशज व निंबीपाडा येथील पुजारी यांच्या विधीपूर्वक पूजेनंतर ही मानाची होळी सर्वांसाठी ठेवत असतात. सातपुड्याच्या कानाकोपऱ्यातील बांधव मोठ्याप्रमाणावर दर्शनासाठी येणार असल्याने यंदा जनसमुदाय वाढण्याची शक्यता आहे. काठीची राजवाडी होळी पाहण्यासाठी देश-विदेशातून मोठ्याप्रमाणावर पर्यटक अधिकारी व मंत्री हे काठी गावाला येतात. दि.३ मार्च रोजी काठी गावाची राजवाडी होळी विधीपूर्वक पेटवली जाणार आहे. या पार्श्वभूमीवर पोलीस प्रशासन, स्थानिक ग्रामपंचायत व तहसीलदार यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व विभागांचे नियोजन सुरू आहे. ही मानाची होळी आणण्याचा अधिकार वंशपरंपरागत ठरलेल्या कुटुंबांनाच आहे.

# नवतंत्रज्ञान कौशल्य अभियान कार्यशाळा

प्रतिनिधी । नंदुरबार

महाविद्यालयीन तरुणांनी नवनवीन तंत्रज्ञान आत्मसात करून उद्योगनिर्मितीत सक्रिय सहभाग नोंदवणे ही काळाची गरज आहे. याच उद्देशाने उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव पुरस्कृत केबीसीएनएमयू सेंटर फॉर इनोव्हेशन, इन्क्युबेशन अँड लिंकेजेस (केसीआयआयएल) आणि जी. टी. पाटील महाविद्यालय, नंदुरबार येथील विद्यार्थी विकास विभाग, तसेच इनोव्हेशन अँड इन्क्युबेशन सेल यांच्या संयुक्त विद्यमाने मानव तंत्रज्ञान कौशल्य अभियान या एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. अध्यक्षस्थानी प्राचार्य तथा विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. एम. जे. रघुवंशी, तर प्रमुख अतिथी मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. नवीन खंडारे, १५० कार्यक्रम उपप्राचार्य डॉ. संदीप पाटील, केसीआयआयएलच्या समन्वयक रोशनी जैन, सहसंस्थापक स्टेमसे टेकफिल्ड एलएलपी व नीची सोल्युशन्स, शिरपूरचे हर्षल सोनवणे तसेचडॉ. रूपेश देवरे उपस्थित होते.

# शिक्षकेतर कर्मचारी रविंद्र कुलकर्णी यांचा निरोप समारंभ

प्रतिनिधी । नवापूर

आदर्श माध्यमिक विद्यालय, रायपूर (ता. नवापूर) येथील ज्येष्ठ शिक्षकेतर कर्मचारी रविंद्र सुधाकर कुलकर्णी हे वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले. त्यांच्या प्रदीर्घ व प्रामाणिक सेवेला मानाचा मुजरा देण्यासाठी शाळेत स्नेहपूर्ण वातावरणात निरोप समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव विजय एस. गावीत होते. त्यांनी रविंद्र कुलकर्णी यांच्या कार्याचा गौरव केला. आदिवासी ज्ञानपिठ नवापूरच्या संस्थाध्यक्षा उर्मिलाताई एम. गावीत तसेच सचिव विजय गावीत आणि मुख्याध्यापक सुमन गावीत यांनी त्यांना भावी आयुष्यासाठी शुभेच्छा देत त्यांचे पुढील आयुष्य सुख, समाधान आणि उत्तम आरोग्यात जावो, अशी सदिच्छा व्यक्त केली.

# दादासाहेब डॉ. सुरेशजी पाटील महाविद्यालयात राष्ट्रीय विज्ञान दिन उत्साहात

## दक्षिण कोरिया येथील शास्त्रज्ञ डॉ. भावना जोशी यांचे ऑनलाइन मार्गदर्शन

प्रतिनिधी । चोपडा

**येथील दादासाहेब डॉ. सुरेश जी. पाटील महाविद्यालयात भौतिकशास्त्र विभागातर्फे दि.२८ फेब्रुवारी रोजी राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त दक्षिण कोरिया येथील बुसुक विद्यापीठातील डॉ. भावना जोशी यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.**

यावर्षीच्या वुमन इज सायनन्स, कॅटेलयाझिंग विकसित भारत या संकल्पनेला अनुसरून डॉ.भावना जोशी यांनी विद्यार्थ्यांना बहुमोल मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य प्रा.डॉ.



के.एन. सोनवणे उपस्थित होते. प्रमुख वक्त्या डॉ. भावना जोशी यांनी आपल्या भाषणात भौतिकशास्त्रातील नवीन प्रवाह आणि संशोधनावर प्रकाश टाकला. तसेच बीएससी आणि एमएस्सी. भौतिकशास्त्रानंतर उपलब्ध असणाऱ्या विविध नोकरीच्या आणि उच्च शिक्षणाच्या संधी. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील महत्त्वाच्या परीक्षांची माहिती दिली.संशोधनासाठी परदेशात उपलब्ध असणारी क्षेत्रे आणि शिष्यवृत्ती याविषयी माहिती देऊन केवळ हार्ड स्किल्सवर अवलंबून न राहता व्यावसायिक यशासाठी सॉफ्ट स्किल्स आत्मसात करण्याचे महत्त्व याविषयी विस्तृत असे मार्गदर्शन केले.

# विज्ञानात जेवढा चिकित्सक वृत्तीने अभ्यास कराल तेवढे ज्ञान अधिक मिळते : गोपाल पाटील

## अमर संस्था संचालित बालमोहन विद्यालयात राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा

प्रतिनिधी । चोपडा

**येथील अमर संस्था संचालित बालमोहन विद्यालयात राषष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त संस्थेचे अध्यक्ष चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते भारतीय भौतिकशास्त्राचे जनक सर सी.व्ही.रमण व विद्येची देवता सरस्वती यांचे पूजन करण्यात आले.**

यावेळी शिक्षक गोपाल पाटील, मुख्याध्यापक प्रदीप चौधरी, साने गुरुजी आदर्श बालवाडीच्या मुख्याध्यापिका रेखा नेवे यांच्यासह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या उपस्थित करण्यात आले. राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त पोस्टर व विविध प्रकारची उपकरणे तयार व सादरीकरण करण्यात आले. यावेळी दुपार सत्रातील विद्यार्थिनींनी अंधश्रद्धावरील एकांकिका सादर केली. यावेळी उपशिक्षक रवींद्र साळुंखे यांनी विज्ञानावरील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी




गोपाल पाटील यांच्याशी संवाद साधताना त्यांनी सांगितले की, प्रत्येक गोष्ट मागे एक विज्ञान असतं. विज्ञानाच्या जेवढा चिकित्सक वृत्तीने अभ्यास केला तर प्रत्येक गोष्टी विज्ञानातून मिळत असते व समाजाला विद्यार्थ्यांना उद्देशाने पटवून द्यायचे असे त्यांनी सांगितले आणि लिटल हार्ट इंग्लिश मीडियम स्कूल इथेही विज्ञान दिनानिमित्त भारतीय भौतिकशास्त्र सर सी.व्ही.रमण व विद्येचे सरस्वती भारत माता यांची पूजन व विज्ञान प्रदर्शनाचे फीत शालेय व्यवस्थापक राकेश पाटील, रेखा पाटील विद्यालयाचे प्राचार्य विजय दीक्षित, यांच्या उपस्थित फीत कापून उद्घाटन करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांनी विज्ञानातील विविध उपकरणे तयार केले होते व त्याची माहिती देत होते. विद्यार्थ्यांनी विज्ञानाकडे जिज्ञासू व संशोधक दृष्टीकोन ठेवावा, तसेच नवकल्पनांना प्रोत्साहन देऊन समाजहितासाठी कार्य करावे, असे मार्गदर्शन केले. पोस्टर सादरीकरण स्पर्धेत विद्यार्थ्यांनी मोठा सहभाग नोंदविला. विद्यार्थ्यांनी विज्ञान व तंत्रज्ञान, पर्यावरण,ऊर्जा, नवकल्पना आदी विविध विषयांवर माहितीपूर्ण व आकर्षक पोस्टर्स सादर करून आपली सर्जनशीलता व वैज्ञानिक दृष्टिकोन प्रभावीपणे वापर केला जातो. यावेळी विद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादक – सागर काशिनाथ ओतारी **(मोबा.– ९९७००५३०६६)** व मालक रेखाबाई काशिनाथ ओतारी यांनी श्री समर्थ कृपा डिजिटल प्रिंटर्स, पी –३३, औद्योगिक वसाहत शॉपिंग कॉम्प्लेक्स, जुनी एमआयडीसी, जळगाव –४२५००१ येथे छापून शॉप नं. ई-१२, चौथा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव– ४२५००१ (महाराष्ट्र), येथे प्रसिद्ध केले.
**✻ कार्यकारी संपादक – किशोर शंकर शिंपी** (✻ पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील) (RNI-MAHMAR/2023/89125) कार्यालय दूरध्वनी क्र. : ०२५७-२२२४०६६, E-Mail : shauryamarathi@gmail.com

# खान्देश महोत्सवात रंगला होम मिनिस्टरचा खेळ

## नगरसेविकांसह महिलांचा उत्स्फूर्त लाभला प्रतिसाद




प्रतिनिधी । जळगाव

**जळगाव शहर महानगरपालिकेतर्फे आयोजित खानदेश महोत्सव अंतर्गत शनिवारी, महिलांसाठी खास होम मिनिस्टर: खेळ पैठणीचा हा कार्यक्रम उत्साहात पार पडला.**

शहरातील ८०० पेक्षा अधिक महिलांच्या विक्रमी उपस्थितीने या सोहळ्याची रंगत वाढवली. दैनंदिन धावपळीतून वेळ काढून महिलांनी त्यांचे दुःख विसरून या ठिकाणी खळखळून हसवणाऱ्या कार्यक्रमात सहभाग घेतल्याने होम मिनिस्टर लोकप्रिय कार्यक्रम ठरला. प्रसिद्ध अभिनेते ओम यादव यांनी आपल्या खुमासदार शैलीत या खेळाचे सूत्रसंचालन केले. कार्यक्रमादरम्यान कधी विनोदी चुटकुले, तर कधी महिलांच्या जीवनातील संघर्षाचे गंभीर प्रसंग अशा विविध छटा पाहायला मिळाल्या. या खेळात सहभागी महिलांच्या चेहऱ्यावर कधी हसू तर कधी आठवणींचे अश्रू असे भाव दाटून आले होते.

**नगरसेवकांसाठी संगीत खुर्ची**

केवळ महिला प्रेक्षकांसाठीच नाही, तर उपस्थित नगरसेवकांसाठी देखील संगीत खुर्ची स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. दिवसभराच्या कामकाजाचा ताण विसरून सर्व लोकप्रतिनिधींनी या खेळाचा मनमुराद आनंद लुटला. होम मिनिस्टर खेळात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या ५ विजेत्या महिलांना मान्यवरांच्या हस्ते आकर्षक बक्षिसे आणि पैठणी देऊन गौरविण्यात आले.

या सोहळ्याला शहराच्या महापौर दीपमाला काळे यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच महिला व बालकल्याण सभापती सिंधू कोल्हे, वंदना इंगळे (स्थायी समिती), महिला व बालकल्याण समितीच्या सदस्या गायत्री राणे, रंजना वानखेडे, पूजा जगताप, विद्या सोनवणे, डॉ. अमृता सोनवणे यांच्यासह नगरसेविका अंकिता पाटील, अनिता भापसे, माधुरी बारी, कविता शिवदे, रेशमा काळे, शशीबाई ढंढोरे, कविता पाटील, जयश्री पाटील, उज्ज्वला बाविस्कर, आशा पाटील प्रवीण कोल्हे, प्रशासकीय अधिकारी अतिरिक्त आयुक्त शोभा बाविस्कर, उपायुक्त निर्मला गायकवाड, उपायुक्त धनश्री शिंदे आणि अधिकारी गायत्री पाटील उपस्थित होते.

प्रचंड गर्दी आणि उत्साहाच्या वातावरणात हा कार्यक्रम संपन्न झाला, ज्यामुळे खान्देश महोत्सवाच्या वैभवात भर पडली.

> **कामाच्या व्यापातून महिलांना थोडा विरंगुळा मिळावा आणि त्यांच्या कलागुणांना वाव मिळावा, हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता. जळगावकर महिलांनी दिलेला प्रचंड प्रतिसाद या महोत्सवाचे यश अधोरेखित करतो.**
>
> **- दीपमाला काळे,**
> महापौर.

## बालविश्व स्कूलमध्ये विज्ञानाचा जागर

प्रतिनिधी । जळगाव

भारतरत्न सी. व्ही. रामन यांच्या सन्मानार्थ साजरा होणाऱ्या राष्ट्रीय विज्ञान दिनाचे औचित्य साधून बालविश्व स्कूल येथे विज्ञान दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांनी आपल्या कल्पकतेतून विज्ञानातील विविध क्लिष्ट संकल्पना जिवंत मॉडेल्सच्या माध्यमातून सादर करत उपस्थितांची मने जिंकली. शाळेतील इयत्ता पाचवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांनी या प्रदर्शनात सहभाग नोंदवला होता. यामध्ये प्रामुख्याने सौरऊर्जा प्रकल्प, पावसाचे पाणी साठवणूक, ज्वालामुखीचे कार्य, जलशुद्धीकरण आणि रोबोटिक्स यांसारखी आधुनिक मॉडेल्स सादर करण्यात आली. विद्यार्थ्यांनी स्मार्ट सिटी आणि पर्यावरणपूरक ऊर्जा स्रोतांवर आधारित मॉडेल्सचे वैज्ञानिक तत्त्व अत्यंत आत्मविश्वासाने समजावून सांगितले.

## महाराष्ट्र योग शिक्षक संघाचे एकदिवसीय राज्यस्तरीय संमेलन



प्रतिनिधी । जळगाव

शारीरिक आणि मानसिक स्वास्थ्यासाठी योगाचा प्रसार करण्याच्या उद्देशाने, महाराष्ट्र योग शिक्षक संघाच्या वतीने जळगाव शहरातील मायावती नगर येथील रोटरी भवनमध्ये शनिवारी (२८ फेब्रुवारी) एकदिवसीय राज्यस्तरीय योग शिक्षक संमेलनाचे उत्साहात आयोजन करण्यात आले. या संमेलनात जळगाव, धुळे, नंदुरबार आणि राज्यातील इतर जिल्ह्यांमधून ३०० हून अधिक योग शिक्षक व साधकांनी सहभाग नोंदवला.

कार्यक्रमाचे उद्घाटन सकाळी ९ वाजता दीपप्रज्वलनाने व मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडले. व्यासपीठावर सारस्वत अतिथी म्हणून डॉ. राजेश जैन, प्रमुख अतिथी प्रसाद कुलकर्णी, संस्थापक सदस्य कृणाल महाजन, योगशिक्षक समितीचे सदस्य डॉ. देवानंद सोनार, महाराष्ट्र योगशिक्षक संघाचे विभाग प्रमुख सुनील गुरव आणि जिल्हाध्यक्ष चित्रा महाजन यांची प्रमुख उपस्थिती होती.

## विद्यार्थ्यांच्या प्रगतीतील अवर्णनीय परिवर्तन म्हणजे रोटरीचा राईप प्रकल्प : ज्ञानेश्वर शेवाळे

प्रतिनिधी । जळगाव

**रोटरी क्लब जळगावने शहरातील १० शाळांमधील ३१० अप्रगत विद्यार्थ्यांच्या जीवनात घडविलेला बदल हा अवर्णनीय परिवर्तन आहे असे रोटरी डिस्ट्रिक्ट ३०३० चे प्रांतपाल ज्ञानेश्वर शेवाळे (नाशिक) यांनी प्रतिपादन केले.**




रोटरी क्लब जळगाव तर्फे या रोटरी वर्षात रोटरी इन्निशन प्रोग्रॅम इन एज्युकेशन अर्थात राईप हा उपक्रम राबविण्यात आला. रोटरी परिवारातील १२ महिलांनी शिक्षकांच्या भूमिकेतून विनामूल्य पद्धतीने विद्यार्थ्यांना विविध खेळ व सोप्या पद्धतीने अभ्यासा विषयीची भीती घालवून गोडी निर्माण करण्याचा यशस्वी प्रयत्न केला. त्यासाठी आठवड्यातून दोन दिवस दोन तास असे ८७८ तास विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्यात आले.

या प्रकल्पाचा समारोप प्रांतपालांच्या उपस्थितीत करण्यात आला. प्रांतपालांनी विद्यार्थ्यांना शिक्षणाचा मूलभूत हक्क रोटरी क्लब जळगावच्या माध्यमातून मिळाला याबद्दल गौरवोद्गार काढले. गणपती नगरातील रोटरी हॉलमध्ये आयोजित या कार्यक्रमास सहप्रांतपाल डॉ.अपर्णा भट - कासार, अध्यक्ष गिरीश कुलकर्णी, मानद सचिव सुभाष अमळनेरकर, बेसिक एज्युकेशन अँड लिटरसी कमिटी चेअरमन प्रा. डॉ. शुभदा कुलकर्णी, प्रकल्पाच्या समन्वयक वसुधा शिगवण यांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती. यावेळी प्रकल्पाबद्दल १२ विद्यार्थी - विद्यार्थिनी, तीन शिक्षिका, दोन राईप प्रकल्पाच्या प्रशिक्षिका आणि पालक यांनी अनुभव कथन केले. कार्यक्रमात या प्रकल्पातील सहभागी १२ प्रशिक्षिकांचा प्रांतपालांच्या हस्ते सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. प्रत्येक शाळेतील प्रथम पाच विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक देण्यात आले. प्रास्ताविक शुभदा कुलकर्णी यांनी तर गिरीश कुलकर्णी यांनी प्रकल्पाची गरज, उद्देश आणि वैशिष्ट्ये सांगत माहिती दिली. सूत्रसंचालन विनिता भट यांनी तर ईशस्तवन हर्षदा भंगाळे यांनी सादर केले. आभार विनया जोशी यांनी मानले. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या वंदे मातरमने कार्यक्रमाचा समारोप झाला.

## मुस्लिम विद्यार्थी असलेल्या मराठी शाळेत मनसेचा राजभाषा गौरव जागर

प्रतिनिधी । जळगाव

**मराठी राजभाषा गौरव दिनाचे औचित्य साधून महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने जळगाव महानगरपालिका संचलित मराठी मुलांची शाळा क्रमांक ३२ मध्ये एक स्तुत्य उपक्रम राबवण्यात आला. मनसे प्रमुख राज ठाकरे यांच्या आदेशानुसार, मराठी भाषेचा अभिमान आणि प्रसार करण्याच्या उद्देशाने येथील शिक्षक आणि विद्यार्थ्यांचे पारंपरिक पद्धतीने स्वागत करण्यात आले.** कार्यक्रमाची सुरुवात शाळेतील शिक्षकांना आणि विद्यार्थ्यांनो फेटे बांधून सन्मानित करण्यात आले. यावेळी सेनेचे जिल्हाध्यक्ष ॲड. जमील देशपांडेसह किरण तळले व पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.




## खुबचंद सागरमल विद्यालयात राष्ट्रीय विज्ञान दिन उत्साहात

प्रतिनिधी । जळगाव

खुबचंद सागरमल विद्यालयात राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा करण्यात आला. हा दिवस महान शास्त्रज्ञ सी व्ही रमन यांनी लावलेल्या रमन परिणाम या महत्त्वपूर्ण शोधाच्या स्मरणार्थ साजरा केला जातो. यावेळी वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करा. चला, आपण सर्वजण विज्ञानाचा आदर करूया, अंधश्रद्धा दूर ठेवूया आणि वैज्ञानिक दृष्टिकोन स्वीकारूया, असे आवाहन करण्यात आले. या प्रसंगी -मुख्याध्यापिका योगिनी बेंडाळे कल्पना देवरे प्रवीण पाटील हे उपस्थित होते.




**जळगाव** - महाराष्ट्र शासनाचा राज्यस्तरीय शाहू फुले आंबेडकर पुरस्कार प्राप्त झाल्यामुळे बहिणाबाई विद्यालयातील मुख्याध्यापक डॉ. विलास नारखेडे यांचा माजी आ. डॉ. सुधीर तांबे यांच्या हस्ते जळगाव जिल्हा माध्यमिक शिक्षकांची पतसंस्था यांच्यावतीने शाल, श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. याप्रसंगी महापौर दीपमाला काळे, नीळकंठ गायकवाड,सोनम पाटील, आ. किशोर दराडे , आ. राजू मामा भोळे, शालिग्राम भिरुड आदी उपस्थित होते.

## दिव्यांगांच्या चेहऱ्यावर हास्य पाहणे भाग्याचे : ना.सावकारे

### भारत विकास परिषदेच्या महाशिबिरात ५६३ दिव्यांगांची उपस्थिती

प्रतिनिधी । जळगाव

**दिव्यांग व्यक्तींच्या चेहऱ्यावरील हास्य पाहायला मिळणे हे भाग्याचे आहे असे राज्याचे वस्त्रोद्योग मंत्री ना. संजय सावकारे यांनी प्रतिपादन केले.**

भारत विकास परिषद जळगाव शाखा व दिव्यांग केंद्र पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने आणि रॉकेट सॉफ्टवेअर यांच्या सहकार्याने रविवारी सकाळी १० वाजता केमिस्ट भवनमध्ये आयोजित दिव्यांग महाशिबिरात ५६३ दिव्यांग उपस्थित होते. यावेळी ते बोलत होते. या शिबिरास खा. स्मिता वाघ, आ. राजूमामा भोळे, जैन इरिगेशनचे अध्यक्ष अशोक जैन, महापौर दीपमाला काळे, उपमहापौर मनोज चौधरी, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे शहर संघचालक उज्वल चौधरी, अविनाश पाटील, दिव्यांग केंद्र पुणेचे प्रमुख व विश्वस्त विनय खटावकर, राजशेखर अभ्यंकर, रॉकेट सॉफ्टवेअरचे संचालक ललित माहेश्वरी, किरण सीला यांची प्रमुख उपस्थिती होती. आ. राजूमामा भोळे यांनी दिव्यांगांना मदतीचा दृष्टिकोन आहे असे सांगितले. रॉकेट सॉफ्टवेअरचे आर्थिक सहकार्य लाभले आहे.



# जळगावच्या 'राजा रयते'चा महानाट्याचा राज्यभर डंका

## १५० स्थानिक कलाकारांचा भव्य अविष्कार! नाटकाचे १५ यशस्वी प्रयोग

प्रतिनिधी । जळगाव

**छत्रपती शिवाजी महाराज यांच्या दैदीप्यमान जीवनावर आधारित राजा रयतेचा या महानाट्याने आपल्या भव्यतेने आणि जिवंत सादरीकरणाने संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष वेधून घेतले आहे. जळगावच्या १५० स्थानिक कलाकार आणि तंत्रज्ञांनी मिळून साकारलेले हे महानाट्य सध्या सांस्कृतिक क्षेत्रात चर्चेचा विषय ठरत आहे.**

**जळगावच्या मातीतील कलाकारांची भरारी**

या महानाट्याचे विशेष वैशिष्ट्य म्हणजे लेखक, दिग्दर्शक, निर्माते आणि सर्व १५० कलाकार हे मूळचे जळगावकर आहेत. यामध्ये नोकरी करणारे, व्यावसायिक तसेच विद्यार्थी आणि विद्यार्थिनींचा समावेश आहे. लेखक दादा नेवे, दिग्दर्शक हेमंत पाटील आणि निर्माते जयवर्धन नेवे यांच्या नेतृत्वाखाली ही संपूर्ण टीम अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने हे महानाट्य सादर करत आहे.



**राजा रयतेचा महानाट्याची वैशिष्ट्ये**

भव्य रंगमंच: हे महानाट्य सादर करण्यासाठी १०० फूट लांब आणि ४० फूट रुंद अशा अवाढव्य रंगमंचाची उभारणी केली जाते, ज्याची उंची साधारण ५८ फूट असते. तांत्रिक सुसज्जता: सराउंड साउंड सिस्टीम वापरणारे महाराष्ट्रातील हे एकमेव महानाट्य असल्याचे सांगितले जाते. यात प्रकाशयोजना आणि ध्वनीचा उत्तम समन्वय साधला जातो. पाच पेट्यांचा (ट्रक) प्रवास: नाटकाचे साहित्य, वेशभूषा (ड्रेपरी), तलवारी, ढाली, मशाल, तोफ आणि सिंहासन यांसारख्या वस्तू वाहून नेण्यासाठी ५ मोठे ट्रक लागतात. विशेष म्हणजे, रंगमंच उभारणीचे कामही नाटकातील कलाकारच स्वतः करतात. जिवंत देखावे: सादरीकरणादरम्यान रंगमंचावर उंट, घोडे आणि बैलगाड्यांचा वापर केला जातो, ज्यामुळे शिवकालीन वातावरण जिवंत होते. प्रमुख ऐतिहासिक प्रसंग आणि प्रतिसाद या महानाट्यात शिवराज्याभिषेक, अफजल खान वध आणि औरंगजेबावरील प्रसंग अतिशय प्रभावीपणे मांडले जातात. राज्याभिषेकाच्या वेळी केली जाणारी भव्य आतशबाजी प्रेक्षकांसाठी आकर्षणाचे केंद्र असते. नुकत्याच पालघरमध्ये झालेल्या ग्लोबल कोकण महोत्सवात पाच दिवसांत तब्बल ४० हजार प्रेक्षकांनी या महानाट्याला उत्स्फूर्त दाद दिली.

**विनामूल्य प्रयोग**

गेल्या दोन वर्षांत या महानाट्याचे महाराष्ट्रात विविध ठिकाणी १५ यशस्वी प्रयोग झाले आहेत. शिवरायांचा इतिहास सर्वसामान्यांपर्यंत पोहोचावा, या उद्देशाने हे सर्व प्रयोग प्रेक्षकांसाठी विनामूल्य ठेवले जातात. जळगावच्या श्री शिवरत्न प्रतिष्ठानने या महानाट्याला दिलेले प्रोत्साहन मोलाचे ठरले आहे. जळगावच्या या कलाकारांनी आपल्या कलेच्या जोरावर ऐतिहासिक नाटकांची एक नवी उंची गाठली आहे, असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

## वरणगावच्या माधुरी महाजन यांची नर्मदा परिक्रमा यशस्वी

प्रतिनिधी । भुसावळ

वरणगाव येथील सावकार गल्लीतील रहिवासी माधुरी किशोर महाजन यांनी दि.५ नोव्हेंबर २०२५ ते १४ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत पवित्र नर्मदा नदी परिक्रमा यशस्वीरीत्या पूर्ण करून उल्लेखनीय आध्यात्मिक कार्य साध्य केले. सुमारे तीन महिन्यांच्या या कठीण, संयमपूर्ण आणि श्रद्धामय प्रवासानंतर त्यांच्या या यशाबद्दल परिसरात अभिमानाची भावना व्यक्त होत आहे. नर्मदा परिक्रमा ही केवळ धार्मिक परंपरा नसून ती श्रद्धा, त्याग, आत्मसंयम आणि अपार मानसिक-शारीरिक सहनशक्तीची कठोर परीक्षा मानली जाते. त्यांच्या पुढील आध्यात्मिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# विटनेर शाळेच्या विद्यार्थ्यांनी गिरवले व्यवहाराचे धडे

## प्राथमिक शाळेत आनंद मेळाव्याचे आयोजन; विविध पदार्थांचे लावले स्टॉल

प्रतिनिधी । चोपडा

**जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा विटनेर (ता चोपडा) येथे नुकतेच बाल आनंद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. आनंद मेळाव्याचे उद्घाटन सरपंच कविता पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. मुख्याध्यापक हेमंत भामरे, विकास पाटील, मनीषा पाटील, प्रवीण पाटील व हेमंत पाटील यांनी मेळाव्याचे नियोजन केले.**

यावेळी विद्यार्थ्यांनी खाद्यपदार्थ व वस्तूंचे स्टॉल लावले. 'कमवा व शिका' संकल्पनेतून व्यवहारज्ञान, उद्योजकता आणि आत्मविश्वास विद्यार्थ्यांना मिळाला. नफा, तोटा, व्यावहारिक ज्ञान,संवाद कौशल्य इत्यादी गुणांची माहिती करून देण्यात आली. विद्यार्थ्यांनी तीन हजार रुपयांची उलाढाल केली.

या मेळाव्याच्या माध्यमातून 'प्रगती रवींद्र कोळी हिच्या फेसबुक पाणीपुरी या स्टॉलचा प्रथम क्रमांक आला.' तिने एकूण ३७० रुपयांचा व्यवसाय करत २१० रुपये नफा मिळवला. द्वितीय क्रमांक निर्भय मच्छिंद्र कोळी याच्या चवदार सोयाबीन बिर्याणी या स्टॉलचा आला. तर तृतीय क्रमांक अंजली गुणवंत कोळी हिच्या 'विटनेरचा स्वादिष्ट साबुदाणा वडा' या स्टॉलला मिळाला. हा कार्यक्रम मुलांमधील स्नेहभावना वाढवण्यास आणि हसत खेळत शिक्षण घेण्यास मदत करणारा ठरला. जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेच्या या अनोख्या आयोजनाला पालक व विद्यार्थ्यांनी भरभरून प्रतिसाद दिला.




**'कमवा व शिका' संकल्पनेतून व्यवहारज्ञान, उद्योजकता आणि आत्मविश्वास विद्यार्थ्यांना मिळाला. नफा, तोटा, व्यावहारिक ज्ञान,संवाद कौशल्य इत्यादी गुणांची माहिती करून देण्यात आली. यासाठी विद्यार्थ्यांनी लावलेल्या विविध स्टॉलवर पालकांसह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी काही वस्तू खरेदी केल्या. त्यामुळे व्यवहार ज्ञानाचे धडे, आनंद मेळाव्यातून विद्यार्थ्यांना प्राप्त करता आले.**

## जामनेर येथे दंत तपासणी शिबिर

प्रतिनिधी । जामनेर

जामनेर येथील उपजिल्हा रुग्णालयात दंत तपासणी शिबिर उत्साहात पार पडले. सिव्हिल सर्जन डॉ. स्वप्निल सांगळे, अतिरिक्त सिव्हिल सर्जन डॉ. आकाश चौधरी तसेच बाह्य संपर्क अधिकारी डॉ. सुशांत सुपे यांच्या मार्गदर्शनाखाली शिबिराचे आयोजन करण्यात आले. शिबिरासाठी इंडियन डेंटल असोसिएशन जळगाव शाखा तसेच राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम (आरबीएसके) पथकाचे सहकार्य लाभले. जामनेर उपजिल्हा रुग्णालय वैद्यकीय अधीक्षक डॉ. हर्षल चांदा जामनेर यांच्या नेतृत्वाखाली शिबिर यशस्वीरित्या पार पडले. शिबिरात शालेय लाभार्थ्यांची दंत तपासणी करण्यात आली. त्यातील २५ लाभार्थ्यांना पिट व फिशर सीलंट या प्रतिबंधात्मक उपचाराचा लाभ देण्यात आला.

## थोडक्यात

### टायगर स्कूलचे विज्ञान प्रदर्शन रंगले

**पाचोरा ।** राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त येथील टायगर इंटरनॅशनल स्कूलमध्ये आयोजित भव्य विज्ञान प्रदर्शन उत्साहात पार पडले. यात इयत्ता १ ली ते ६ वीच्या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवत विविध वैज्ञानिक प्रयोग आणि प्रात्यक्षिके सादर केली. विद्यार्थ्यांनी सौर ऊर्जा, ग्रह-तारे, जलचक्र, पाणी शुद्धीकरण, टाकाऊपासून टिकाऊ वस्तू, सूक्ष्मदर्शक, विद्युत उचलयंत्र आदी विषयांवरील आकर्षक प्रकल्प सादर केले. प्रकल्प तयार करताना निरीक्षण, प्रयोगशीलता, संशोधन, समस्या सोडविण्याची क्षमता, संघभावना आणि आत्मविश्वास यांचा विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभव आला. स्पर्धेच्या माध्यमातून अंधश्रद्धा निर्मूलन या विषयावर प्रबोधनपर सादरीकरण करत विद्यार्थ्यांनी वैज्ञानिक विचारसरणीचा प्रसार केला.

### निंभोरी येथे बायर शिक्षण केंद्राचे उद्घाटन

**पाचोरा।** तालुक्यातील निंभोरी गावात प्रगतिशील शेतकरी बाबुलाल नारायण मोराणकर यांच्या शेतात बायर शिक्षण केंद्र जळगाव या कृषी मार्गदर्शन केंद्राचे उद्घाटन संदिप बाबुलाल मोराणकर यांच्याहस्ते करण्यात आले. उद्घाटन समारंभात बायर कंपनीचे अधिकारी, कृषी तज्ज्ञ तसेच परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमादरम्यान कंपनीच्या अधिकाऱ्यांनी पीक संरक्षण, आधुनिक शेती तंत्रज्ञान, सुधारीत बियाणे आणि नवीन औषधांच्या वापराबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. शेतकऱ्यांना प्रत्यक्ष शेतात प्रात्यक्षिके दाखवून विविध तंत्रज्ञानाची माहिती दिली गेली. ज्यामुळे ते आधुनिक शेती पद्धतींचा प्रत्यक्ष अनुभव घेऊ शकले. यावेळी गावातील काही ज्येष्ठ शेतकऱ्यांचा शाल, श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.

## प्रताप महाविद्यालयाच्या भूगोल विभागाचा भौगोलिक अभ्यास दौरा उत्साहात

प्रतिनिधी । अमळनेर

**येथील प्रताप महाविद्यालयाच्या भूगोल विभागामार्फत एकदिवसीय भौगोलिक अभ्यास दौऱ्याचे आयोजन करण्यात आले होते. या दौऱ्यात बी.ए.व एम.ए.च्या एकूण ३५ विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. राष्ट्रीय उच्चत्तर शिक्षण अभियान व महाविद्यालयाच्या भूगोल विभागाच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम राबविण्यात आला.**



भूगोल विषयातील संकल्पना प्रत्यक्ष क्षेत्र भेटीतून अधिक स्पष्टपणे समजतात. या उद्देशाने आयोजित केलेला हा दौरा विद्यार्थ्यांसाठी अत्यंत ज्ञानवर्धक ठरला. भूगोल आणि इतिहास यांतील परस्पर संबंध प्रत्यक्ष अनुभवातून जाणून घेण्याची मौल्यवान संधी विद्यार्थ्यांना मिळाली. दौऱ्याची सुरुवात महाराष्ट्र-मध्यप्रदेश सीमेवरील बिजासनी माता मंदिर येथे दर्शन व स्थळ परिचयाने झाली. विद्यार्थ्यांनी धार्मिक स्थळांच्या स्थाननिश्चितीमागील भौगोलिक कारणांचा शोध घेण्याचाही प्रयत्न करण्यात आला. यानंतर विद्यार्थ्यांनी नर्मदा नदीकाठी वसलेल्या महेश्वर शहराला भेट दिली. येथे अहिल्याबाई होळकर यांचा किल्ला, राजवाडा, निवासस्थान, महादेव मंदिर तसेच नर्मदा घाट परिसराचा अभ्यास करण्यात आला. हा अभ्यास दौरा प्राचार्य डॉ. एच. डी. जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीरीत्या पार पडला.

## चोपडा येथील रोहन राखेचा चार्टर्ड अकाउंटंट पदवी परीक्षा उत्तीर्ण

प्रतिनिधी । चोपडा



**येथील व्यापारी संघटनेचे कार्याध्यक्ष व जैन दादावाडी ट्रस्टचे विश्वस्त दीपक धरमचंद जैन यांचे सुपुत्र रोहन दीपककुमार राखेचा यांनी चार्टर्ड अकाउंटंट ही पदवी परीक्षा उत्तीर्ण केली.**

रोहनच्या यशाबद्दल महावीर पतपेढीचे संस्थापक चेअरमन प्रा.शांतीलाल बोथरा, जैन समाजाचे संघपती सुभाषचंद्र बरडिया, संघपती गुलाबचंद देसरडा, दादावाडी ट्रस्टचे अध्यक्ष बाबुलाल बोथरा, भारतीय जैन संघटनेचे जिल्हाध्यक्ष निर्मल बोरा, जैन समाजाचे सचिव विनोद टाटीया, पीपल्स बँकेचे व्हाईस चेअरमन सुनील बुरड, दादावाडी ट्रस्टचे ट्रस्टी सुनील बरडिया आदींनी अभिनंदन केले व्यापारी संघटनेचे अध्यक्ष अमृतराज सचदेव, माजी नगरसेवक संजय कानडे, महेंद्र सोनार, भारतीय जैन संघटनेचे माजी जिल्हाध्यक्ष जितेंद्र बोथरा, जिल्हा सचिव दर्शन देशलहरा, माजी तालुकाध्यक्ष आदेश जैन, तालुकाध्यक्ष गौरव कोचर यांनी रोहनच्या यशाबद्दल शुभेच्छा दिल्या आहेत.

## हिंदकी चादर उपक्रमांतर्गत पाच विद्यार्थी ठरले सर्वोत्कृष्ट!

प्रतिनिधी । मुक्ताईनगर

हिंद की चादर श्री गुरु तेग बहादुर साहेब जी यांच्या ३५० व्या शहिदी समागम शताब्दी वर्षानिमित्त शिक्षण विभागातर्फे तालुक्यात विविध उपक्रम राबविले जात आहेत. या उपक्रमांतर्गत तालुक्यातील पाच विद्यार्थी सर्वोत्कृष्ट ठरले आहेत. याबाबत अधिक माहिती अशी श्री गुरु तेग बहादुर शाहिबजी यांच्या ३५० व्या शताब्दी वर्षानिमित्त शासकीय परिपत्रकानुसार ग्रामपंचायती, शाळा, महाविद्यालय, शैक्षणिक संस्था आदी ठिकाणी विविध उपक्रम राबविले जात आहेत.

त्यापैकी तालुकास्तरावर सर्वोत्कृष्ट ठरणाऱ्या ग्रामपंचायत शाळा तथा विद्यार्थी शैक्षणिक संस्था यांना जिल्हास्तरावर पुढील स्पर्धेसाठी पाठविले जाणार आहे. मुक्ताईनगर तालुक्यात शिक्षण विभागातर्फे ५० गुणांची विविध स्पर्धा घेण्यात आल्या. यामध्ये निबंध स्पर्धा-हूमेर हसन सय्यद, डॉ. जगदीश पाटील इंग्लिश मीडियम स्कूल मुक्ताईनगर प्राप्त गुण ४०, वक्तृत्व स्पर्धा- दिविजा विजयकुमार डांगे,जे.ई.स्कूल मुक्ताईनगर, प्राप्त गुण एकूण ३९, जानवी विकास पाटील जे.ई. स्कूल मुक्ताईनगर प्राप्त गुण ३८, चित्रकला स्पर्धा-अर्पिता भागवत पाटील घाटे ए.एस. विद्यालय उचंदा प्राप्त गुण ३६, निबंध स्पर्धा-आलिया अकबर शहा फकीर नवीन माध्यमिक विद्यालय सुकळी प्राप्त गुण ३४, सदर पाचही विद्यार्थ्यांचे शिक्षण विभागातर्फे गटशिक्षणाधिकारी वसंत मोरे यांनी अभिनंदन केले असून पाचही विद्यार्थ्यांना जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी पात्र ठरले आहेत.

## पीएसआय भगवान कोळी यांची नागपूर क्राईम ब्रँचमध्ये बढतीवर नियुक्ती

प्रतिनिधी । चोपडा

**एकेकाळी गाजलेल्या मुंबईचा फौजदार या चित्रपटाप्रमाणे खाकी वर्दीतील रुबाब आणि बाणेदारपणा अनेकांना प्रेरणा देतो. अशाच जिद्दीने आणि चिकाटीने छोट्याशा खेड्यातून प्रवास सुरू करत भगवान खंडू कोळी यांनी पोलीस खात्यात आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे.**



अत्यंत साध्या कुटुंबात जन्मलेले कोळी यांचे आई-वडील मोलमजुरी करून संसार चालवत होते. शालेय जीवनात अनवाणी पायाने धावण्याचा सराव करत त्यांनी शिक्षण पूर्ण केले. आश्रमशाळेतून शिक्षण घेतल्यानंतर पोलीस भरतीत प्रयत्न करत ते पोलीस शिपाई झाले. त्यानंतर मैदानी स्पर्धांमध्ये सातत्याने प्रथम क्रमांक पटकावत त्यांनी आपली गुणवत्ता सिद्ध केली.

१९९६ पासून चोपडा, अमरावती, जळगाव, शहादा, सिन्नर, नंदुरबार, सारंगखेडा आणि मालेगाव येथे त्यांनी प्रामाणिकपणे सेवा बजावली. चोपड्यात त्यांनी शेकडो तरुणांना विनामूल्य मार्गदर्शन व भरतीपूर्व प्रशिक्षण देऊन पोलीस दलात दाखल होण्यासाठी घडवले. मालेगावसारख्या संवेदनशील ठिकाणी हिंदू-मुस्लीम ऐक्य टिकवण्यासाठीही त्यांनी उल्लेखनीय कार्य केले.

नुकतीच त्यांची पीएसआय पदावरून सहाय्यक पोलीस निरीक्षक म्हणून नागपूर येथे गुन्हे शाखेच्या नॉरकोटिक्स विभागात बढतीवर नियुक्ती झाली आहे. दिल्ली, हिमाचलसह विविध राज्यांतील स्पर्धांत शंभरपैकी शंभर गुण मिळवत विक्रम नोंदविणारे, मेहनती, रुबाबदार आणि उत्कृष्ट गायक म्हणूनही त्यांची ओळख आहे. त्यांच्या या यशाबद्दल सर्वत्र अभिनंदन होत आहे.

## गीतालक्ष्मी पाटीलचे सीए परीक्षेत यश

प्रतिनिधी । चोपडा



**येथील गीतालक्ष्मी (कल्याणी) पुरुषोत्तम पाटील हिने आयोजित चार्टर्ड अकाउंटंट (सीए) अंतिम परीक्षेत उत्कृष्ट गुणांनी उत्तीर्ण होत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. कठोर परिश्रम, जिद्द आणि सातत्यपूर्ण अभ्यासाच्या जोरावर तिने हे यश मिळविले.**

साध्या शेतकरी कुटुंबातून पुढे येत सीएसारखी कठीण परीक्षा उत्तीर्ण होणे हे तिच्या चिकाटीचे प्रतीक मानले जात आहे. ती गणपूर येथील मूळ रहिवासी असून धुळे एमआयडीसीतील आदित्य फूड्सचे मालक पुरुषोत्तम भास्कर पाटील यांची कन्या आहे.

तिच्या या यशामुळे कुटुंबियांसह गावकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

विविध सामाजिक व शैक्षणिक संस्थांच्या पदाधिकाऱ्यांनी तिचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.


## मुक्ताईनगरला अमृत-२ योजना लवकरच पूर्णत्वास येणार : आ. चंद्रकांत पाटील

प्रतिनिधी । मुक्ताईनगर

**शहरासाठी३३कोटी रुपयांची अमृत -२ पाणीपुरवठा योजना लवकरच पूर्णत्वास येऊन शुद्ध जल मुक्ताईनगरवासीयांना मिळेल, असे प्रतिपादन चंद्रकांत पाटील यांनी येथे अमृत-२ पाणीपुरवठा योजनेच्या पाण्याच्या टाकीचे भूमिपूजन व फलक अनावरण प्रसंगी केले.**



व्यासपीठावर शिवसेनेचे तालुकाप्रमुख नवनीत पाटील, उपनगराध्यक्ष देवयानी शिरसाट पाणीपुरवठा सभापती सौ.सविता भलभले, शिवसेनेचे जिल्हा संघटक सुनील पाटील,माफदाचे अध्यक्ष विनोद तराळ, बोदवडचे दिनेश माळी आदी उपस्थित होते. आ चंद्रकांत पाटील पुढे म्हणाले की, जनतेने आपल्यावर विश्वास दाखवलेला आहे.आपण पुरेसे शुद्ध पाणी देऊ, रस्ते बनवू,तरुणांना रोजगारासाठी एमआयडीसीची प्रक्रिया आता शेवटच्या टप्प्यात आहे. बस आगाराजवळील व्यापार संकुलाची जागाही हस्तांतरण करण्याच्या प्रक्रिया सुरू आहे. शहरात सर्वत्र भूमिकत गटारी बनवण्याचा प्रस्तावदेखील अंतिम टप्प्यात आहे. मुक्ताईनगरचा विकास खऱ्या अर्थाने होऊ लागलेला आहे. सर्व नगरसेवकांनी खऱ्या अर्थाने सेवावृत्ती ठेऊन प्रत्येक नागरिकाला आपल्या माध्यमातून सेवा दिली पाहिजे. पाणी योजना आपण खऱ्या अर्थाने कॉन्ट्रॅक्टरच्या माध्यमातून एक चांगल्या पद्धतीने करून घेतली पाहिजे. खूप चांगलं काम करण्यावर लक्ष असू द्या. अर्थसंकल्पीय अधिवेशनात आपण शहरात व मतदारसंघातल्या प्रत्येक गावासाठी चांगला निधी आणण्याचा प्रयत्न करीत आहोत, असेही आ.चंद्रकांत पाटील यांनी सांगितले.



## ॐ सिद्धेश्वर महादेव मंदिरात वर्धापनदिनानिमित्त महाप्रसाद

### चोपडा येथील महावीर नगरातील भक्तांच्या नवसाला पावणारे जागृत देवस्थान

प्रतिनिधी । चोपडा

**शहरातील महावीर नगर परिसरातील जागृत देवस्थान म्हणून ओळख असलेल्या ओम सिद्धेश्वर महादेव मंदिरात वर्धापनदिनानिमित्त दि.८ मार्च रोजी, ११०० भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. ८० वर्षीय रणछोडदास लोहार यांनी इच्छापूर्ती झाल्याच्या भावनेतून हा नवस फेडण्याचा संकल्प केला आहे.**



**आर्थिक परिस्थिती हलाखीची असतानाही रणछोडदास लोहार यांनी पै-पै साठवून नवस फेडण्याचा निर्धार केला आहे. त्यांच्या असीम श्रद्धेचे परिसरातील नागरिकांकडून कौतुक करण्यात येत आहे. श्रद्धा आणि सेवाभाव यांचे हे उदाहरण ठरत असल्याची भावना व्यक्त होत आहे.**

महावीर नगरातील रहिवासी असलेले रणछोडदास लोहार काही दिवसांपूर्वी रस्त्यावर चालताना पडल्याने त्यांच्या पाठीच्या कण्याला दुखापत झाली होती.

वैद्यकीय तपासणीनंतर वयोमानामुळे पूर्णपणे बरे होणे कठीण असल्याचे डॉक्टरांनी सांगितल्याची माहिती मिळते.

मात्र, त्यानंतरही त्यांनी हार न मानता दररोज पहाटे मंदिरात जाऊन पूजा-अर्चा व सेवा सुरू ठेवली. काही दिवसांत त्यांच्या प्रकृतीत सुधारणा झाल्याचा त्यांचा दावा आहे. भोलेनाथांच्या कृपेने आपण वैद्यकीय खर्चाविना चालू लागलो, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे. याच श्रद्धेतून दि.८ मार्च रोजी ११०० भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

यापूर्वीही मंदिरात दर्शनाने मनोकामना पूर्ण झाल्याचा काही भक्तांचा अनुभव असल्याचे सांगितले जाते. आदर्श नगर, पंकज स्टॉप, बोरोलेनगर, सुदर्शन कॉलनी परिसरातील भाविकांचा येथे वाढता कल दिसून येत आहे.

## बालाजी विद्यालयात बक्षीस वितरण सोहळा

प्रतिनिधी । पारोळा

येथील बालाजी विद्याप्रबोधिनी मंडळ संचलित पूर्व प्राथमिक व प्राथमिक विद्यालयात बक्षीस वितरण सोहळा व माजी विद्यार्थी संघाची स्थापना करण्यात आली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष यु.एच. करोडपती तर प्रमुख पाहुणे संस्थेचे सचिव डॉ. सचिन बडगुजर, विद्यालयाचे माजी विद्यार्थी पारोळा नगरपालिका अभियंता सुमित पाटील, नगरसेवक अमोल शिरोळे, मुख्याध्यापक हेमंतकुमार पाटील, प्राचार्य विजय बडगुजर, प्राचार्या स्वाती बलखंडे, राधिका बडगुजर व माजी विद्यार्थी आदी उपस्थित होते. मान्यवरांनी बालाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन केले. याप्रसंगी माजी विद्यार्थी सुमित पाटील व अमोल शिरोळेसह माजी विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. यावेळी अभियंता सुमित पाटील व नगरसेवक अमोल शिरोळे यांनी जीवनातील प्रसंग व अनुभव याबाबत मार्गदर्शन केले. तसेच माजी विद्यार्थी संघाची स्थापना यावेळी करण्यात आली.